CNRNOMHSN090014242022

# <u>सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जि. सांगली.</u>

(पीठासिन अधिकरी श्री. एस.वाय.वाकचौरे)

**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक २३६/२०२२.</u>**
**<u>निशाणी क्र.८ वरील आदेश.</u>**

| | | |
|---|---|---|
| ०१. | **निसर्ग क्रॉप केअर.** | **<u>वादी.</u>** |
| | ***विरुध्द.*** | |
| ०१. | **ओम अॅग्रो एजन्सी.** | **<u>प्रतिवादी.</u>** |

(०१). प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचे विरुध्द झालेला ‘एकतर्फा आदेश' रद्द करुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

(०२). अर्ज व त्यावरील वादीने दाखल केलेल्या जबाबाचे अवलोकन केले. प्रतिवादी व वादीतर्फे विव्दान वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

(०३). प्रतिवादीचे थोडक्यात कथन असे की, प्रतिवादी हे मजूरी निमित्त परराज्यात होते. त्यामुळे त्यांना न्यायालयात हजर राहता आले नाही. म्हणून त्यांच्याविरुध्द विरुध्द 'एकतर्फा आदेश' पारीत झालेला आहे. तो रद्द होणे आवश्यक आहे. सदर आदेश रद्द झालयाने वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतू प्रतिवादींचे कधीही पैशाच्या स्वरुपात भरुन येणार नाही असे अपरिमित असे नुकसान होणार आहे. यास्तव त्यांनी सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**(०४).** सदर अर्जावर वादीने म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, अर्जास लावलेले कारण संयुक्तिक नाही. अर्जातील कारणांच्या पृष्ठयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. केवळ दाव्याचे कामकाज लांबणीवर पडावे म्हणून प्रतिवादी दाव्यात हजर झाले नाहीत. यास्तव प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करावा अशी वादीने विनंती केली आहे.

**(०५).** उभय पक्षकारांच्या वतीने करण्यात आलेली परस्पर विरोधी कथने विचारात घेवून अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, प्रस्तुतचा दावा हा वादीने रक्कम वसुल होवुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी हे समन्स लागुनही दाव्यात हजर झालेले नाहीत म्हणून त्यांच्याविरुध्द 'एकतर्फा आदेश' पारीत झालेला आहे. दावा गुणदोषावरती निकाली करण्यासाठी सदर प्रतिवादीला तीची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक ठरते. अर्जातील कारणाच्या पृष्ठयर्थ कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नसल्याने अर्जात नमुद केलेले कारणे संयुक्तिक वाटत नाही. परंतू, नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादीला त्याची बाजू मांडण्याची संधी देणे उचीत ठरणार आहे. प्रतिवादीविरुध्द झालेला एकतर्फा आदेश बाजुला सारुन त्यांचे म्हणणे अभिलेखावर घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही असे दिसते. प्रतिवादी हे दाव्यात वेळेत हजर न झाल्यामुळे दाव्याचे कामकाज लांबणीवर पडले आहे. त्यामुळे प्रतिवादीच्या वागण्यामुळे दाव्यामध्ये जो उशीर झालेला आहे त्याची भरपाई म्हणून योग्य तो खर्चाचा आदेश पारीत करुन अर्ज मंजूर करणे उचीत होणार आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

**०१.** प्रस्तुतचा अर्ज रक्कम रुपये ५००/– च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो.

**०२.** खर्चाची रक्कम प्रतिवादीने वादीला आज अगर पुढील तारखेस दयावी.

**०३.** प्रतिवादीविरुध्द झालेला 'एकतर्फा आदेश' वरील खर्चाची रक्कम भरल्यानंतर रद्द ठरवून प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर घेतले जाईल.

SATISH YASHWANT WAKCHAURE

Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2026.03.07 17:15:03 +0530

**तासगांव.** (एस.वाय.वाकचौरे)
दिनांक :०७.०३.२०२६. सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**तासगांव.**

# <u>प्रमाणपत्र</u>

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री. अभय अरविंद रणदिवे |
| न्यायालय | – | सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,<br>तासगांव, जिल्हा सांगली. |
| दिनांक | – | ०७.०३.२०२६. |
| न्यायीक अधिकारी यांनी<br>सही केलेली दिनांक | – | ०७.०३.२०२६. |
| आदेश अपलोड दिनांक | – | ०७.०३.२०२६. |